गीत ः प्रेमाला

अल्बम ः प्रेमाला

गायिका ः प्रियांका बर्वे

गीत ः सत्यजीत रानडे संगीत ः अविनाश विश्वजीत

प्रेमाला ओढ आज त्या कुणाची
रातराणीच्या फुलाची पाकळी हळुहळु फुलावी
प्रेमाला ओढ आज त्या कुणाची

रातराणीच्या फुलाची  धुंद आज प्रीत मोहरावी
मनीच्या दिशा मोकळया अशा
छेडती कशा तान ही नवी
तुझे प्रेम रे माझ्या मना
देई जणू नवी पालवी
प्रेमाला ओढ आज त्या कुणाची
रातराणीच्या फुलाची पाकळी हळुहळु फुलावी

अरे ऐक ना तुला सांगते
गाज आज मिलनाची मनी वाजते
वाहते हवा आणि चांदवा
भरते मनात आशा असे वाटते
असा हा शहारा मला आज देना
मिठी ही तुझी रे दे पुन्हा एकदा
स्पर्शरंग हे लेऊनी असे
प्रेमचित्र हे कोणरंगवी
गोडगोजिरे चित्र पाहण्या
साथ रे मला तुझी ही हवी
प्रेमाला ओढ आज त्या कुणाची
रातराणीच्या फुलाची पाकळी हळुहळु फुलावी

अरे ऐक ना मी ही ऐकते
एकतार पावसाळी झंकारते
साज ही मनी थेंब छेडती
ओली नवी पुन्हा ही प्रीत वाहते
अवेळी ढगाला जशी जाग आली
तसा तु समोरी ये पुन्हा एकदा
शोधते तुला प्रीतीच्या वनी
वाट रे तुझी मेघ दाखवी
सोबतीस रे सांजवेळ ही
वाटते मला ही हवी हवी
प्रेमाला ओढ आज त्या कुणाची
रातराणीच्या फुलाची पाकळी हळुहळु फुलावी